• संपादकीय

संसदीय धिंगाणा

प्रचंड गदारोळात सरकारने राज्यसभेत जीएसटी विधेयक ठेवले. सरकारला या अधिवेशनात आपण काय कामगिरी केली हे दाखवून देण्यासाठी हे एकमेव उदाहरण आहे. संसद बंद पाडून काँग्रेस देशाचा आर्थिक विकास रोखत असल्याचा अर्थमंत्री अरुण जेटली व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकाच दिशेतून आरोप असला तरी काँग्रेसही भाजपला त्यांच्या गेल्या सहा वर्षांतल्या संसदेतील धांगडधिंग्याबद्दल हेच प्रश्न विचारू शकते. पण मुद्दा त्याहून अधिक व्यापक आहे की, २८२ एवढे लोकसभेत विक्रमी बळ असूनही भाजपच्या फ्लोअर मॅनेजमेंटला, मोदी, जेटली, राजनाथ सिंह व सुषमा स्वराज या राजकारणात मुरलेल्या वरिष्ठ नेत्यांना संसद कशी चालवावी हे लक्षात आले नाही. जेव्हा वातावरण तंग होणार आहे हे माहीत असते, रस्त्यावर लढाई सुरू झालेली असते, अशा प्रसंगी आपण सत्ताधारी आहोत, विरोधक नाही हे या धुरिणांना उमजले नाही. त्यामुळे काँग्रेसच्या भ्रष्टाचाराच्या आरोपाला उत्तर देताना काँग्रेसच्या ६० वर्षांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे हे कुशल सत्ताधाऱ्यांचे लक्षण म्हणता येत नाही. जनतेने काँग्रेस व इतर पक्षांचे भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी भाजपला निवडून दिलेले नाही, तर देशाच्या विकासासाठी त्यांना मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेले आहे. पण पहिल्या वर्षातच या पक्षाच्या महत्त्वाच्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले जातात व त्याला लोकसभेत उत्तर देण्याऐवजी पंतप्रधानांनी जाहीर सभांमध्ये क्लीन चिट देणे हे संसदीय लोकशाहीत कुणालाही पटण्यासारखे नाही. आयपीएलचे माजी कमिशनर ललित मोदी यांच्यावर वादग्रस्त पद्धतीने केलेल्या मेहेरबानीवरून गेले दोन महिने सुषमा स्वराज व वसुंधरा राजे यांच्या विरोधात हवा तापली होती. ती तप्त हवा घेऊनच संसदेत विरोधक गोंधळ घालणार होते हे साफ स्वच्छ दिसत होते. पण या आरोपांना पुढे जाऊन तोंड देणार कोण हा प्रश्न भाजपच्या शीर्ष नेत्यांमध्ये प्रतिष्ठेचा झाल्याने व शह काटशहाच्या पक्षांतर्गत खेळी सुरू झाल्याने हे अधिवेशन वाया गेले. मोदी-जेटली गट विरुद्ध सुषमा-अडवाणी गट यांच्यातील सुप्त संघर्ष या निमित्ताने दिसून आला. मोदींनी पुढे येऊन सुषमा स्वराज यांना क्लीन चिट दिली तरी त्याचा अर्थ सुषमा यांना अभय दिले, असा पसरवला जाणारा राजकीय संदेश सुषमा कॅम्पला नको होता, तर मोदींनी या विषयावर लोकसभेत बोलल्यास काँग्रेसच्या आरोपांना झेलावे लागेल, अशी स्थिती मोदींना नको होती. यूपीए-२ सरकारच्या कारकीर्दीत चौफेर टीका करणाऱ्या सुषमा स्वराज आता मंत्री म्हणून पदाचा गैरव्यवहार केल्याच्या आरोपात एवढ्या अडकल्या की काँग्रेसच्या २५ खासदारांना निलंबित केल्यानंतर रिकाम्या सभागृहात त्यांना ललित मोदी प्रकरणातील भूमिका मांडून वेळ मारून न्यावी लागली; पण त्यांचा हा प्रयत्न व्यर्थच होता. त्यांचे सभागृहातील निवेदन व बाहेरील वक्तव्ये विसंगत होती आणि त्याला कोणी गंभीरपणे घेतलेही नाही. उलट काँग्रेस अधिक आक्रमक झाली. स्वराज यांनी त्यांच्या बँक अकाउंटची माहिती सार्वजनिक करावी व ती केल्यास आम्ही संसद चालू ठेवू, अशी मागणी काँग्रेसने केल्याने हा तिढा लगेच संपणारा नाही हे लक्षात यायला हरकत नाही.

हे अधिवेशन एवढे गोंधळाचे का ठरले यामागची पार्श्वभूमी म्हणजे गेल्या वर्षभरात भाजपने लोकसभेत विरोधी पक्षाचे मानाचे स्थान न देता काँग्रेसला नामोहरम करण्याच्या अनेक चाली खेळल्या; पण काँग्रेसला सर्व बाजूंनी एकटे पाडत असताना भाजपने अन्य नवे साथीदार जोडले नाही की त्यांना चुचकारलेही नाही. (मोदींनी अखेरच्या क्षणी मुलायम सिंह यांना जवळ केले; पण त्याला उशीर झाला होता.) त्यामुळे जेव्हा सुषमा स्वराज्य यांच्यावर बालंट आले तेव्हा काँग्रेसेतर विरोधकांना काँग्रेसच्या गोंधळात सामील व्हावे लागले. उद्या भविष्यात आपलाही बळी जाईल, अशीही भीती प्रादेशिक पक्षांना होती. ती या पक्षांच्या राजकीय भूमिकेवरून अनाठायी म्हणता येणार नाही. पण यावर कडी केली ती मोदी यांच्या मौनाने. पंतप्रधानांनी परराष्ट्रमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा, अशी जेव्हा मागणी लोकसभेत काँग्रेसने सुरू केली तेव्हा हा गोंधळ जनतेपुढे जाऊ नये, असे वर्तन लोकसभा अध्यक्ष व चॅनेलचे होते. त्यामुळे संतप्त झालेल्या काँग्रेसच्या खासदारांनी व अन्य विरोधकांनी हातात फलक घेऊन लोकसभा अक्षरशः वेठीस धरली. हे सुरू असताना काँग्रेसच्या आक्रमक आरोपांना उत्तर देण्याची वेळ येऊ नये म्हणून खुद्ध पंतप्रधान म्हणून मोदी यांनी लोकसभेत येणेच टाळले. पुढे काँग्रेस खासदारांचे निलंबन प्रकरण सरकारला अधिक अडचणीत आणणारे ठरले. मोदींचे सोयीस्कर व आपमतलबी मौन हा आता एकूणच राजकारणात व देशात चेष्टेचा विषय झाला आहे. त्यांचे मौन देशाच्या हितासाठी की भाजपसाठी की सुषमा स्वराज वादात आपली मान अडकू नये म्हणून स्वतःसाठी आहे, याबाबत शंकाकुशंका निर्माण होणे हे भाजपच्या एकूणच प्रतिमेला हानीकारक आहे. मोदींची प्रतिमा जपणे हे पक्षाचे आद्यकर्तव्य आहे, अशा थाटात हा सगळा संसदीय खेळ सुरू आहे.

वित्त संहिता आवश्यकच !

• अर्थमत - नियंत्रक संस्थांचे नियमन करणारी संहिता आवश्यक आहे.

रविकिरण साने
अर्थशास्त्राचे अभ्यासक
rksane@gmail.com

भारतीय वित्त संहितेच्या नावाखाली मोदी सरकार रिझर्व्ह बँकेवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे, अशा आरोपातून नव्या वादाला सुरुवात झाली आहे. पतधोरण ठरवत असताना रिझर्व्ह बँकेतील आणि बाहेरील अर्थतज्ज्ञांचा आणि सरकारचा सल्ला ऐकायचा की नाही, हे ठरवण्याचा सर्वाधिकार (व्हेटो) रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांकडे आहे. एकाच व्यक्तीला असा सर्वाधिकार देण्याऐवजी पतधोरणाचा निर्णय सक्षम समितीने घ्यावा, अशी तरतूद येऊ घातलेल्या वित्त संहितेमध्ये आहे. त्यामुळे सर्व वाद, चर्चा गव्हर्नरना व्हेटो असावा की नाही, याभोवतीच फिरते आहे. पण संहितेच्या निमित्ताने भारतातील अर्थकारणाचे नियमन कसे असावे आणि कोणी करावे, हे महत्त्वाचे पैलू मात्र दुर्लक्षित होत आहेत.

रिझर्व्ह बँक ही यशाचे पतधोरण ठरवणारी संस्था स्वायत्त आहे आणि या स्वायत्ततेवरच मोदी सरकार घाला घालत आहे, असा विरोधकांचा आरोप आहे. मुळात कोणत्याही संस्थेची स्वायत्तता ही मर्यादितच असते. कारण त्या संस्थेला घालून दिलेल्या कक्षेबाहेर घडणाऱ्या घटनांवर तिचे नियंत्रण असत नाही. शिवाय सतत बदलत जाणाऱ्या अर्थकारणामध्ये रिझर्व्ह बँकेसारख्या अनेक संस्थांची भूमिकाही व्यापक संदर्भात बदलत असते. त्याचा विचार न करता एखादी संस्था स्वायत्ततेच्या नावाखाली हटवादी भूमिका घेत असेल, तर अर्थकारणाचे आणि देशाचे मोठे नुकसान होत असते. ज्या मुद्द्यावरून हा हटवादीपणा केला जातो, तो मुद्दाच बदलत्या परिस्थितीत संदर्भहीन झाला आहे का, याचा विचारही करावा लागतो, जो होतो आहे, असे दिसल्यामुळेच रिझर्व्ह बँक आणि अर्थमंत्री यांच्यात मतभेदाची स्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या जूनमध्ये नवे पतधोरण जाहीर करीत असताना डॉ. रघुराम राजन यांनी तीन महत्त्वाचे मुद्दे मांडले होते. यामध्ये मोसमी पाऊस कमी होण्याची शक्यता, जागतिक पातळीवर तेलाचे दर वाढण्याची शक्यता आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हची संभाव्य दरवाढ लक्षात घेऊन आपण मोठ्या प्रमाणात दरकपात करू शकत नाही, असे त्यांचे म्हणणे होते. दोन महिन्यांनंतर ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. भीती वाटत होती तेवढा पाऊस कमी झालेला नाही. तेलाचे दरही अपेक्षेप्रमाणे वाढलेले नाहीत. अमेरिकन फेडरल रिझर्व्हने कोणताही निर्णय घेतलेला नाही. याशिवाय घाऊक निर्देशांक खूप खाली गेला असून, तो नकारात्मकच आहे. पावसाने दिलेल्या ओढीमुळे किरकोळ निर्देशांक थोडासा चढा असला, तरी एकूण परिस्थितीत त्याला महत्त्व राहिलेले नाही. अशा वेळी डॉ. राजन यांनी दरांमध्ये कपात करावी, असा आग्रह सरकारने, उद्योगांनी आणि बँकांनीही धरला होता. प्रत्यक्षात राजन यांनी तो न मानता दरस्थिती 'जैसे थे'च ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे सर्वच क्षेत्रांत नैराश्य पसरले आहे व त्याचा परिणाम विकासाच्या गतीवर होत आहे.

ऑगस्ट महिन्यातील पतधोरण जाहीर केल्यानंतर दिलेल्या एका मुलाखतीत डॉ. राजन यांनीही गव्हर्नरना व्हेटो अधिकार नसावा, असेच मत व्यक्त केले आहे. आपल्या या मताचे स्पष्टीकरण देताना डॉ. राजन म्हणतात, 'व्हेटोमध्ये तो निर्णय व्यक्तीच्या भूमिकेचा असतो. समितीने त्यासंबंधी निर्णय घेतला, तर एकाचेच म्हणणे प्रभावी ठरणार नाही आणि व्यक्तीपेक्षा समिती बाहेरील दबावांना अधिक समर्थपणे तोंड देऊ शकेल.' डॉ. राजन यांच्या या जाहीर भूमिकेमुळे व्हेटोसंबंधीचा वाद संपला असला तरी हा एकाधिकार काढून घेणे सोपे मात्र नाही. त्यासाठी रिझर्व्ह बँक कायद्यात सुधारणा करावी लागेल. ती सध्याच्या संसदीय पेचप्रसंगात कधी शक्य होईल, हे आताच सांगता येणार नाही.

रिझर्व्ह बँक ही यशाचे पतधोरण ठरवणारी संस्था स्वायत्त आहे आणि या स्वायत्ततेवरच मोदी सरकार घाला घालत आहे,

असा विरोधकांचा आरोप आहे.

मुळात कोणत्याही संस्थेची स्वायत्तता ही मर्यादितच असते. कारण त्या संस्थेला घालून दिलेल्या कक्षेबाहेर घडणाऱ्या घटनांवर तिचे नियंत्रण असत नाही.

गव्हर्नरांना असलेला एकाधिकार, एवढाच इथे महत्त्वाचा मुद्दा नाही. रिझर्व्ह बँक देशातील सर्व बँकिंग व्यवस्थेचे नियंत्रण करत असते. सहकारी बँक, पतसंस्था, सहकारी कायद्याखाली स्थापन झाल्या असल्या तरी बँकिंगसंदर्भातले नियमन रिझर्व्ह बँकेकडेच आहे. सार्वजनिक बँका आज आर्थिक डबघाईला आल्या असताना रिझर्व्ह बँक त्याचे निराकरण कसे करणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आजवर केंद्र सरकार बँकांमध्ये दरवर्षी हजारो कोटी रु.ची गुंतवणूक करीत राहिले; पण बँकांचा कारभार मात्र सुधारला नाही. बँकिंग व्यवस्थेचे मूल्यांकन आणि पुनर्रचना करण्याचा अधिकार रिझर्व्ह बँकेकडे आहे. पण यापूर्वीच्या गव्हर्नरांनी तो वापरल्याचे दिसत नाही. म्हणूनच नोदींना पुढाकार घेऊन बँकिंगवर विस्तृत चर्चा घडवणारी परिषद घ्यावी लागली.

बँकिंगचे व्यवहार सुरळीतपणे चालावेत, यासाठी सरकारने कोणते नवे कायदे किंवा उपाय करावेत, हेदेखील रिझर्व्ह बँकेने सांगायला हवे. सार्वजनिक बँकांची लाखो, कोटींची कर्जे बुडीत असताना अपुऱ्या कायद्यांमुळे या बड्या धेंडांवर कारवाईच होत नाही. दिलेल्या कर्जांचे पुनःपुन्हा पुनर्गठन फक्त होत राहते. अशा स्थितीत केंद्राने बँकांना पुढील ५ वर्षांसाठी ७५ हजार कोटी रु.चे भांडवल पुरवले, तरी फरक काय पडणार, हा प्रश्नच आहे. डॉ. राजन यांनी अलीकडेच एक चांगले पाऊल उचलले आहे. बँकांमध्ये इतरांनी अधिकाधिक गुंतवणूक करावी, म्हणून भांडवल पुरवणाऱ्या संस्थांशी त्यांनी चर्चा केली. त्या वेळी एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला. आपल्याकडे दिवाळखोरीचा (बँककरप्टसी) कायदाच अस्तित्वात नाही. त्यामुळे कर्ज बुडवणाऱ्यांवर कारवाई करून, त्यांची मालमत्ता ताब्यात घेऊन, ती विकता येत नाही. 'हा कायदा करा, मग सार्वजनिक बँकांतून आम्ही भांडवल गुंतवू' असे या संस्थांनी सांगितले आहे. पतधोरणातील दरकपातीचा मुद्दा एवढा महत्त्वाचा का, हेही लक्षात घेतले पाहिजे. केंद्र सरकारने विकासाच्या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या मोहिमांची घोषणा केली आहे. त्यासाठी सरकारला लाखो कोटी रु.ची गुंतवणूक देशात व्हायला हवी आहे. दरकपात झाली, तर ही गुंतवणूक वेगाने होऊ शकते. दुसरीकडे मागणीत वाढ न झाल्यामुळे उत्पादन थंडावले आहे. सरकारी बँकांचे महाग कर्ज परवडत नाही, हा मुख्य आक्षेप आहे. विकासाला चालना देण्याचे काम सरकारचे असले, तरी रिझर्व्ह बँकेचे पतधोरण त्याला पूरक नसेल, तर दरातच नव्हे, तर अर्थकारणातही 'जैसे थे' स्थितीच राहणार आहे.

भारतीय वित्त संहितेचा संबंध फक्त रिझर्व्ह बँकेशी नाही. सेबी, ईडीसह अर्थव्यवस्थेचे नियंत्रण करणाऱ्या अनेक संस्था आपण स्थापन केल्या आहेत. सेबी आणि ईडीतील अधिकारांचा वाद अजून विस्मरणात गेलेला नाही. त्यामुळे सर्वच नियंत्रक संस्थांचे एकात्मिक नियमन करणारी संहिता आवश्यक झाली आहे.

• ट्विट्स ऑफ द डे

भालचंद्र पेंढारकरांसम दुसरा रंगकर्मी होणे नाही. काळाच्या उदरात क्वचितच अशी माणसं घडत असतात. विनम्र श्रद्धांजली

देवेंद्र फडणवीस@Dev_Fadnavis

निष्पाप मुलांशी गैरवर्तन मानवतेला कलंक आहे. पाक सरकारने २८० मुलांच्या शारीरिक शोषणप्रकरणी दोषींना कडक शासन द्यावे.

कैलास सत्यार्थी@K_sathyarthi

पाणी, गॅस, वीज, घरभाडे, वैद्यकीय खर्च व प्रवास महागला तर त्याला आर्थिक विकास म्हटले जाते. भाज्यांचे भाव वाढले तर चलनवाढीचा परिणाम.

देविंदर शर्मा @Devinder Sharma

वादग्रस्त राधेमाँला विमानात त्रिशूल नेऊ दिला जातो. त्रिशूलाचा आक्षेपार्ह वस्तूंत समावेश नाही का?

विनीता देशमुख@VinitaDeshmukh

झुंजूमुंजू होताच दव माखला कण न् कण 'शुभ प्रभात' साऱ्यासाठी मंत्र शिंपडून गेले कोण?

अमृता कुलकर्णी @devlekar17

अदब सीखना है तो... कलम से सीखो, जब भी चलती है, सिर झुका कर चलती है।

अनुपम खेर@AnupamPKher

Web दिव्य मराठी

फीनिक्स हार्बर विमानतळावर रेल्वे पुलाखालून जातात विमाने

• ज्ञान

सर्वसामान्यपणे पुलाखालून रेल्वे जातात, मात्र फीनिक्स आंतरराष्ट्रीय विमानतळावर टॅक्सवेची धावपट्टी अशी तयार केली आहे की, त्यावरून रेल्वे जातात. ३० मीटर उंच पूल उत्तर व दक्षिण धावपट्टीला जोडतो. फीनिक्स स्काय हार्बर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-४ पर्यंत लोकांना पोहोचता यावे, यासाठी डिसेंबर २००८ मध्ये तेथे स्काय ट्रेन योजना तयार करण्यात आली. एप्रिल २०१३ मध्ये त्याचा पहिला टप्पा सुरू झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये टर्मिनल २-३ पर्यंत स्काय ट्रेन पोहोचवण्यात आली आहे. • visitingphx.com

सुरुवातीला प्रवाशांना टर्मिनलपर्यंत पोहोचवण्यासाठी स्काय ट्रेनऐवजी शटल बसेस चालवण्यात येत होत्या. मात्र, त्यांच्यामुळे ध्वनी व वायुप्रदूषण होत होते. स्काय ट्रेन प्रवाशांसाठी जास्त सुविधाजनक असल्याचे मानले गेले आहे. टॅक्सवे धावपट्टीवर रेल्वेची यंत्रणा कार्यरत असलेले हे जगातील पहिले ठिकाण आहे.

संपर्क वाढवण्यासाठी लोकांची पोस्ट लाइक करत आहेत अमेरिकन नेते

• इंटरनेट

अमेरिकेत बराक ओबामा यांनी २००८ मध्ये आपल्या प्रचारादरम्यान इंटरनेट व विशेषकरून सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांना आपल्याबरोबर जोडले होते. इंटरनेटच्या वेबसाइटवर फॅन पेज तयार करण्यात आले. त्या पेजशी लोक जुळले की ओबामा आणि डेमोक्रॅटिक पक्षाला जनाधार किती वाढला याची माहिती मिळत असे. जास्तीत जास्त लोकांना जोडण्यासाठी रिपब्लिकन पार्टीनेही हा मार्ग निवडला होता. मात्र, त्यांना यश आले नाही. या वेळी रिपब्लिकन पार्टीच्या नेत्यांनी जास्तीत जास्त लोकांशी जुळता यावे, यासाठी त्यांची पोस्ट लाइक करणे सुरू केले आहे. ते इंटरनेटवर नवीन फॅन बनवून त्यांना आपल्या कार्याशी जोडत आहेत. नोव्हेंबरमध्ये निवडणुकीच्या प्रचाराला वेग येणार आहे. सर्वाधिक दहा उमेदवार रिपब्लिकन पार्टीकडून निवडणूक रिंगणात आहेत. प्रमुख उमेदवार डोनाल्ड ट्रॅम्प, जेब बुश आणि स्कॉट वॉकर आदी आहेत. हे सर्व नेते प्रचार सभांबरोबरच सोशल मीडियावरही सक्रिय आहेत. ते अमेरिकन युजर्सच्याच पोस्टला लाइक देतात. आवश्यकता वाटल्यास प्रतिक्रियाही व्यक्त करतात. त्यांना युजर्स लाइक देतात. व्हायरल झालेल्या पोस्टमध्ये जास्तीत व्हिडिओ किंवा फोटो असतात. हे उमेदवार कोणत्या विषयावर चर्चा होत आहे हे लक्षात ठेवतात. त्यावर प्रतिक्रिया देऊन ते चर्चेत सहभागी होतात. • northwestmoinfo.com

फ्लायबोर्ड प्रोफेशनल्सचा स्टंट व्हिडिओ नेटवर हिट

• प्रसिद्ध

वॉटर स्पोर्ट्समध्ये काही दिवसांपूर्वीच समावेश करण्यात आलेल्या फ्लायबोर्डची लोकप्रियता खूप वाढली आहे. अमेरिकेच्या नॅशविलेची मोंटगोमेरी बेल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी व्हिसल स्पोर्ट्सच्या फेसबुक पेजवर नवा व्हिडिओ अपलोड केला आहे. पाच दिवसांत त्याला आठ लाख लोकांपेक्षा जास्त लोकांनी पाहिले व ४,९०० लोकांचे लाइक मिळाले. ९,८०० पेक्षा जास्त वेळा हा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. अकॅडमीचे विद्यार्थी फ्लायबोर्ड प्रोफेशनल आहेत. त्यांनी कम्बरलँड नदीत स्टंटचा व्हिडिओ तयार केला केला होता. त्यामध्ये एक विद्यार्थी पुलाच्या वरून डिस्क फेकतो आणि खाली असलेले विद्यार्थी त्याला पाण्याच्या साहाय्याने झेल घेतात. अशाच प्रकारे एक विद्यार्थी जेट स्कीवर नदीच्या काठावर लावण्यात आलेल्या नेटवर बॉल टाकतो. फ्लायबोर्डच्या आव्हानांचा सामना करणारे कुडी गार्डनर म्हणतात की, जेट स्कीमुळे तुम्ही पाण्याच्या वर येता आणि तरफ फिरू लागतात. हे जेवढे सोपे वाटते तेवढे नसते. त्यासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. नाहीतर अपघातही होऊ शकतो. व्हिसल कंपनी तलावांमध्ये असे कार्यक्रम घेते. हा व्हिडिओ तयार

करण्यासाठी कंपनीने कम्बरलँड नदीची निवड केली. याच्या मागे आमचे शहर दिसत असल्याने आम्हाला आनंद झाला. हा व्हिडिओ केवळ सोशल मीडियावरच हिट होत नसून अमेरिकेच्या राष्ट्रीय चॅनलवरूनही दाखवण्यात आला आहे.

फ्लायबोर्डचा शोध 2012 मध्ये फ्रेंच वॉटरक्रॉफ्ट रायडर फ्रँकी जपाटा यांनी लावला होता. त्याचे डिझाइन असे तयार करण्यात आले होते की, पायलट पाण्यातून बाहेर येऊ शकेल आणि हवेत त्यांचे संतुलन कायम राहील. फ्रान्सच्या औद्योगिक संपदेच्या राष्ट्रीय संस्थानने त्यांना याचे पेटंट प्रदान केले आहे. • wkrn.com

नॉलेज दिव्य मराठी आरोग्य

फ्लॅटफूट

फ्लॅटफूटची समस्या 10 पैकी 4 लोकांना जाणवते. हा त्रास बहुतांश महिलांमध्ये अधिक असतो. कारण त्यांचे सांधे ढिले असतात. दीर्घकाळ उपचार न केल्याने भविष्यात पायाच्या पंज्यांमध्ये आर्थरायटिसचे कारणही बनू शकते.

डॉ. प्रदीप मुनोत
ऑर्थोपेडिक सर्जन specialising knee, foot & ancal surgery, ब्रीच कँडी हॉस्पिटल ट्रस्ट, मुंबई

जन्मतःच सर्वच मुलांचे पायाचे पंजे सपाट असतात, पण वाढत्या वयात त्याचे पॉश्चर बदलते. ते चालायला शिकतात. त्यांच्या मांसपेशी मजबूत होत असतात. ९-१० वर्षांच्या वयात पायांचा विकास होतो. सामान्यतः पायाच्या पंज्यात आर्च होण्याने शरीराचा भार घोट्यावर आणि पंज्यावर एकाच वेळी पडतो. त्यामुळे आपण धावपळ करू शकतो. फ्लॅटफूट असल्याने शरीराचा संपूर्ण भार पायावर विभागला जातो.

यामुळे जास्त काळ उभे राहण्याची आणि हिंडण्याफिरण्याची समस्या निर्माण होते. यामुळे पिंडऱ्याच्या मांसपेशीमध्ये दुखणे सुरू होते. यामुळे सपाट पायाची समस्या आणखी गंभीर होते. हा त्रास १० मधील ४ लोकांना असतो. चपटे तळवे म्हणजे, फ्लॅटफूट प्रामुख्याने दोन प्रकारचे असतात.

१) फ्लेक्झिबल, २) रिजिड

फ्लेक्झिबल फ्लॅटफूटमध्ये साधारणतः पायाचा आकार चांगला दिसतो; पण दबाव पडल्यानंतर पायांचे संतुलन राहत नाही. पाय चपटे होतात.

रिजिड फ्लॅटफूटमध्ये पंजाचा आकार समतल असतो. चपट्या तळव्याची समस्या जेव्हा मूल चालू लागते तेव्हा दिसून येते. ज्या मुलांमध्ये आर्चचा योग्य विकास होत नाही, त्यांच्यात जास्त चाललयानंतर पायात दुखणे किंवा थकवा येणे अशा तक्रारी असतात. त्यावर दीर्घकाळ उपचारच केले नाहीत, तर पुढे चालून पंज्यात आर्थरायटिसचे कारण होऊ शकते. रिजिड फ्लॅटफूटमध्ये दुखणे अधिक वाढल्याने सर्जरी करावी लागते.

कारणे : • फ्लॅटफूट असल्याने सांधे ढिले असतात. त्यामुळे वजन वाढल्यामुळेही असे होते. पायात एक प्रकारची विशिष्ट नस असते, जिला टिबिया पोस्टेरियर असे म्हणतात. ती पायाच्या आर्चला संतुलित ठेवते. ती खूप सूज किंवा लठ्ठपणामुळे फाटते. यामुळे फ्लॅटफूटची समस्या निर्माण होते.

• लहानपणी पायातील दोन हाडे जोडली गेली तर ज्याला टॉर्सल कोअॅलिशन असे म्हणतात. यामुळे पाय कडक आणि सपाट होतात.

• फूट आर्थरायटिस, हा पायाच्या मागील बाजूस किंवा मध्यभागी असतो. साधारणतः यात ठणक असते. तो मार लागल्याने किंवा अन्य कारणानेही होऊ शकतो.

• कधी-कधी पायाला मार लागणे किंवा फ्रॅक्चर होणे, सपाट तळवे असल्याने होऊ शकते. लिगामेंट्स तुटल्याने किंवा कमकुवत झाल्याने हाडे एकमेकांशी जखडून राहण्याऐवजी ढिली होतात.

• याशिवाय लठ्ठपणा, पायात किंवा घोट्यास मार लागणे, रुमेटाइड आर्थरायटिस आणि वय वाढणे तसेच डायबिटिस इत्यादी कारणामुळे काही लोकांत अशी लक्षणे दिसून येतात.

मुख्यत: • चालताना पायात किंवा घोट्यात दुखणे.

• पळताना दुखणे.

• घोट्याच्या आतील बाजूस सूज येणे

• कधी कधी पायाचे तळवे किंवा आतून मुंग्या येणे अथवा सुन्नपणा जाणवणे असे होऊ शकते. कारण घोट्याचे मज्जातंतू खेचले जातात किंवा दबतात.

निदान : • एक्स-रे पाहून फ्लॅट फूटबाबतची स्थिती कळते. यात फ्लॅटफूटचे आर्थरायटिस हे एक लक्षण मानले जाते, तेही कळते. एमआरआय आणि सीटी स्कॅनद्वारे यासंदर्भात माहिती मिळण्यास उपयुक्त ठरते.

उपचार : • दुखत नसल्यास यासाठी उपचार घेणे गरजेचे नाही. पण पाय सपाट असेल, पण लवचिक असेल तर साधे इन्सोल आणि फिजिओथेरपीद्वारा ठीक करता येते. समस्या केवळ नसा असामान्य असल्याने निर्माण होत असेल तर फिजिओथेरपीद्वारा ठीक करता येते. आर्च सपोर्ट (आर्थोटिक उपकरणे)मुळे होणाऱ्या दुखण्यास आराम मिळतो. जर औषधे आणि खास बूट काम करत नसतील तर सर्जरी करणे आवश्यक आहे.

उपचार घेताना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते. तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार घेणे किंवा औषधी घेणे आरोग्यासाठी घातक ठरते. तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यानंतरच उपचार सुरू करावेत.

• वस्तुस्थिती

इन्स्टिट्यूट ऑफ एजिंग रिसर्च, बोस्टनच्या मते फ्लॅटफूटपीडित महिलांपैकी ५० टक्के महिलांना कमरेखालच्या भागात ठणक असते.